देशोन्नती दि. 18.7.2025

# विमानतळ पोलिसांनी २४ तासात १२ वर्षीय मुलीचा घेतला शोध

## अपहरण केलेल्या आरोपी तरुणासह मुलीला छत्रपती संभाजीनगरातून घेतले ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मिशन निर्भया अंतर्गत अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलींचा शोध घेणे बाबत दिलेल्या सूचनेवरून विमानतळ पोलिसांनी अपहरण केलेल्या १२ वर्षीय मुलीसह आरोपी तरुणास छत्रपती संभाजीनगर येथून २४ तासात ताब्यात घेतले.

यातील नमुद महिला फिर्यादी (४५) रा. नांदेड यांनी विमानतळ पोलिसांकडे त्यांच्या १२ वर्षीय अल्पवयीन मुलीस यातील आरोपी ओमकार मारोती पानपट्टे (१८) रा. वसमत याने १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजताचे सुमारास जिजामाता हायस्कुल, गांधीनगर नांदेड येथुन फुस लावुन पळवून नेल्याची तक्रार दिली होती. यावरून विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोनि गणेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ तपासाची चक्र फिरवून आरोपीचे मोबाईलचे सायबर विभागाचे मदतीने लोकेशन हस्तगत केले असता त्याचे लोकेशन छत्रपती संभाजीनगर दाखवल्याने तात्काळ विमानतळ पोलीसांचे पथक सदर ठिकाणी जावुन २४ तासाचे आत आरोपी व अल्पवयीन मुलीस ताब्यात घेवुन त्यांना पोलीस स्टेशन येथे घेवून येवून अल्पवयीन मुलीस सुरक्षितरित्या तिचे पालकांच्या ताब्यात दिले, तर आरोपीवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवाई पथकात सपोनि गोविंद जाधव, पोउपनि विनोद साने, प्रदीप साखरे, पोहेकॉ नितीन इंगळे, किशन चितोरे, व ईतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

